समता न्याय एकात्मता

महाराष्ट्र शासन

**सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय सोलापूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सात रस्ता सोलापूर-४१३००१

दुरध्वनी क्र. ०२१७-२७३४९५० ई-मेल आयडी – acswosolapur@gmail.com

जा.क्रं.साआसकसो/अजाउयो/निविदा सूचना/२०२१-२२/४९६४ सोलापूर दि. २९/१०/२०२१

# निविदा सूचना

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर हे जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजना सन २०२१-२२ मध्ये अनु.जाती उपयोजने अंतर्गत राबवणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण/ नाविन्यपूर्ण योजनेतूनअनुसूचित जाती, जमाती अत्याचार (प्रतिबंध) अधिनियम १९८९, सुधारित अधिनियम २०१५ व सुधारित नियम२०१६ (अॅट्रॉसिटी)या योजनेचे सॉफ्टवेअर करणेबाबत अधिकृत कंपनी/एजन्सीकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | तपशील | अंदाजित रक्कम (रु.लाखात) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | अनुसूचित जाती, जमाती अत्याचार (प्रतिबंध) अधिनियम १९८९, सुधारित अधिनियम २०१५ व सुधारित नियम२०१६ (अॅट्रॉसिटी) या योजनेचे सॉफ्टवेअर तयार करणे. | **पोलीस विभाग**<br>**उपविभागीय पोलिस अधिकारी (लॉगीन)**<br>1. अनुसूचित जाती, जमाती अत्याचार (प्रतिबंध) अधिनियम १९८९, सुधारित अधिनियम २०१५ व सुधारित नियम २०१६ गुन्हा दाखल झाल्यानंतर संबंधित पोलिस स्टेशनचे अधिकारी यांना फिर्यादी/पिडीताचे अहवाल, एफ.आर.आय. प्रत, जातीचा दाखला, आधार कार्ड, बँक खाते तपशील इत्यादी कागदपत्रे अपलोड करणे.<br>2. खून, बलात्कार या प्रकरणात घडलेल्या गुन्हामधील शवविच्छेदन अहवाल व वैद्यकीय अहवाल अपलोड करणे.<br>3. मा. न्यायालयात दोषारोप दाखल दाखल केल्यानंतर दोषारोप प्रत साक्षांकित करून अपलोड करणे. | १०.०० |



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | 4. खून प्रकरणात मयत व्यक्तीचा जातीचा दाखला व मयताचे वारस यांचा जातीचा दाखला साक्षांकित करून अपलोड करणे.<br>5 . मा. न्यायालयाच्या निर्णय झाल्यानंतर निकालाची प्रत अपलोड करणे.<br><br>**पोलिस निरीक्षक नागरी हक्क संरक्षण (लॉगीन)**<br>नागरी हक्क संरक्षण शाखेकडून गुन्हेसंदर्भात पिडीतास भेट दिलेले अहवाल अपलोड करणे<br>**समाज कल्याण विभाग**<br>**समाज कल्याण निरीक्षक (लॉगीन)**<br>१. संबंधित फिर्यादी/पीडित व्यक्तीचे कागदपत्रे पोलीस विभागाकडून प्राप्त झाल्यानतर प्रकरण तपासून टिपणीसह अर्थसहाय्य पहिला हप्ता/दुसरा हप्ता/अतिंम हप्ता मंजूरी करिता सादर करणे.<br>२. अर्थसहाय्य मंजूर झाल्यानतर मंजुरी आदेश अपलोड करणे.<br>३. मंजुरी आदेशप्रमाणे तरतूद प्राप्त झाल्यानतर संबंधित फिर्यादी/पीडितास भ्रमणध्वनीवर संदेश पाठविणे.<br>**सहाय्यक लेखाधिकारी (लॉगीन)**<br>प्रकरण तपासून अर्थसहाय्य मंजुरी करिता वरिष्ठ अधिकारी स सादर करणे.<br>**सहायक आयुक्त समाज कल्याण (लॉगीन)**<br>संबंधित फिर्यादी/पीडित व्यक्तीचे अर्थसहाय्य पहिला हप्ता/दुसरा हप्ता/अतिंम हप्ता मंजूरी करिता मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे.<br>**मा. जिल्हाधिकारी (लॉगीन)**<br>संबंधित फिर्यादी/पीडित व्यक्तीचे अर्थसहाय्य पहिला हप्ता/दुसरा हप्ता/अतिंम हप्ता अर्थसहाय्य मंजूरी आदेशास मान्यता देणे.<br>**मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (लॉगीन)**<br>संबंधित जिल्ह्यास अर्थसहाय्य मंजुरी आदेशप्रमाणे तरतूद उपलब्ध करून देणे.<br>**मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे**<br>संबंधित विभागास अर्थसहाय्य मंजुरी आदेशप्रमाणे तरतूद उपलब्ध करून देणे.<br>**डॅशबोर्ड व विहित नुमन्यात जिल्हानिहाय, विभागनिहाय व राज्याचे अहवाल तयार करणे.**<br>**पोर्टलचे मुखपृष्ठ व विभागाचे इत्तर योजनांची माहिती दर्शविणे.** | |



Scanned with CamScanner

**अटी व शर्ती**

१. दरपत्रक फॉर्म विक्री दिं.१.११.२०२१ ते दि.०३.११.२०२१ सकाळी १०.०० पासून ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, आंबेडकर भवन, सात रस्ता सोलापूर येथे मिळतील व दि.१०.११.२०२१ पर्यत स्वीकारले जातील . (फॉर्म शुल्क-१००/-)

२. दरपत्रक लिफाफा दि. ११/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता सहायक आयुक्त, समाज कल्याण सोलापूर येथे उघडण्यात येईल. सर्व संबंधित सादर केलेल्या आवश्यक मूळ कागदपत्रसह उपस्थित राहू शकतील.

३. प्राप्त दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारणेचे अधिकार सहायक आयुक्त समाज कल्याण,सोलापूर यांनी राखुन ठेवले आहेत.

४. व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र / संस्था नोंदणी प्रमाणपत्र / व्यापारी घटक असल्यास शॉप ॲक्टचे प्रमाणपत्र अदययावत असणे आवश्यक आहे.

५. आयकर नोंदणी प्रमाणपत्र (पॅनकार्डची प्रत) निविदेसोबत जोडणे अनिवार्य आहे.

६. विक्रिकर नोंदणी प्रमाणपत्र (TIN / VAT NO/GST) सादर करणे

७. सन २०२०-२१ अखेर व्यवसायकर भरणा केल्याची पावती/निपटारा प्रमाणपत्र सादर करणे.

८. ठेकेदाराच्या देयकातून नियमाप्रमाणे आयकराची रक्कम कपात करण्यात येईल.

९. यापुर्वी शासकीय/निमशासकीय/खाजगी कंपनी / संस्थेस सॉफ्टवेअर तयार करून दिल्याचे संबंधीत यंत्रणेचा अनुभवाचा दाखला.

१०. दरपत्रक मंजूरीनंतर १५ दिवसाच्या आत सॉफ्टवेअर तयार करुन देणे बंधनकारक राहील

११. निवीदेच्या एकूण रकमेमध्ये सर्व प्रकारच्या कराचा समावेश असेल.

१२. तयार केलेले सॉफ्टवेअर तांत्रिकदृष्ट्या योग्य असलाचे सक्षम यंत्रणेकडून प्रमाणित करून देणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

१३. सॉफ्टवेअरमध्ये तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास पुढील ०१ वर्षाकरिता विनामुल्य देखमाल दुरस्ती करणे व तसे बंधपत्र देणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

(विलास राठोड)
**सहायक लेखा अधिकारी**
**सहायक आयुक्त**
**समाज कल्याण कार्यालय सोलापूर**



Scanned with CamScanner